सोशल मिडीया          शाय.ब्रँ

पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय

मिल कॉर्नर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर
पिन-431001. दुरध्वनी क्रमांक 0240-2240591
ई-मेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

जा.क्र.वि.स.नि. कक्ष/आदेश/2024- १४७          छत्रपती संभाजीनगर, दि. 17/11/2024

## मतदानाचे दिवशी मतदान केंद्राचे परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) (3) मनाई आदेश

**आदेश:-**

ज्याअर्थी, मा.भारत निवडणुक आयोगाने दिनांक 15/10/2024 रोजीच्या प्रसिद्धि पत्रकान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक 2024 चा कार्यक्रम जाहीर केलेला असुन त्यानुसार आदर्श आचार संहिता लागु झालेली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघाचे मतदान दिनांक 20/11/2024 रोजी होणार आहे. विधानसभा मतदार संघामध्ये पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर शहरातील 106-फुलंब्री, 107- औरंगाबाद (मध्य), 108 औरंगाबाद (पश्चिम), 109-औरंगाबाद (पुर्व), 111- गंगापुर, या विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

ज्याअर्थी, मतदानाचे दिवशी मतदान केंद्राचे परिसरात मोठ्या प्रमाणात होणा-या मतदारांच्या गर्दीचा फायदा घेवून मतदान प्रक्रियेस अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न आणि कायदा व सुव्यवस्था बाधित करण्याचा प्रयत्न समाजकंटक लोकांकडून होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आणि ज्याअर्थी, विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया खुल्या, निर्भय, शांतातमय वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. तसेच मा. निवडणूक आयोगाचे निर्देशाप्रमाणे सदर प्रक्रियेदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये याकरीता तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील 106-फुलंब्री, 107- औरंगाबाद (मध्य), 108 औरंगाबाद (पश्चिम), 109- औरंगाबाद (पुर्व), 111-गंगापुर, विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रावर मतदान साहित्यासह मतदान पथक दिनांक 19/11/2024 रोजी पोहचणार असून त्यांचे जवळ इव्हीएम, व्हि. व्हि. पेट व इतर संवेदनशिल साहित्य राहणार आहे, त्यास अपाय होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील 106-फुलंब्री, 107- औरंगाबाद (मध्य),108 औरंगाबाद (पश्चिम), 109-औरंगाबाद (पुर्व), 111-गंगापुर, या विधानसभा मतदार संघात मतदान केंद्राचे ठिकाणी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) (3)अन्वये मनाई आदेश लागु करणे आवश्यक झाले आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी **मी, प्रविण पवार, पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) (3) अन्वये मला प्राप्त झालेले अधिकारानुसार पोलीस आयुक्तालय हद्दीतील 106-फुलंब्री, 107- औरंगाबाद (मध्य), 108 औरंगाबाद (पश्चिम), 109-औरंगाबाद (पुर्व), 111-गंगापुर, या विधानसभा मतदार संघात पोलीस आयुक्तालय हद्दीतील मतदान केंद्राचे 100 मीटर परिसरातील खालीलप्रमाणे कृती करणेस मनाई करणेकरीता आदेश निर्गमित करत आहे.

1. मतदान केंद्रापासुन 100 मीटर त्रिजेच्या परिसरात प्रचार करणे, बेकायदेशिर जमाव जमवणे, हत्यार बाळगणे, मतदाराना आमिष दाखवणे, मतदारांना मतदान करण्यापासुन रोखणे, धुम्रपान करणे, ज्वलनशील पदार्थ नेणे.
2. मतदान केंद्रापासुन 100 मीटर त्रिजेच्या परिसरात कोणत्याही सार्वजनिक वा खाजगी जागेमध्ये ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यासारखे मानवी आवाजाचे वर्धन करणारा किंवा तो तसाच्या तसा ऐकवणारा उपकरण संच वापरणे किवा चालविणे.
3. 100 मीटर प्रतिबंधित त्रिजेच्या क्षेत्राचे बाहेरील भागावरून ध्वनिक्षेपकांचा असा वापर करणे की, ज्यामुळे मतदान केंद्रावरील निवडणूक आयोगाचे कर्मचारी आणि मतदानासाठी येणारे मतदार यांना त्याचे कर्तव्य पार पाडण्यामध्ये बाधा निर्माण होणार नाही.
4. मतदान केंद्रापासुन 100 मीटर त्रिजेच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे वाहन आणने.
5. मतदारांना ने-आण करण्यासाठी अनाधिकृतपणे वाहनांचा वापर करणे.
6. मतदान केंद्रापासुन 100 मीटर परिसरात राजकीय नेत्यांचे फोटो, चिन्ह वापरणे आणि घोषणा करणे.
7. मतदान केंद्रापासुन 100 मीटर त्रिजेच्या परिसरात हॉटेल, टेलीफोन बुध, झेरॉक्स मशीन, फेरीवाले यांनी व्यवसाय करणे.

सदरचा आदेश निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीची कर्तव्य बजावणारे सर्व अधिकारी व कर्मचारी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तैनात करण्यात आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी आणि मतदान केंद्रावर मतदान प्रक्रियेत सहभागी असणारे अधिकारी/कर्मचारी यांना लागु राहणार नाही.

सदरचा आदेश दिनांक 18/11/2024 रोजी सायंकाळी 06.00 वाजेपासुन ते दिनांक 20/11/2024 रोजीचे 24.00 वाजेपर्यत लागु राहील. हा आदेश आज दिनांक /11/2024 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्यानिशी निर्गमित करण्यात आला.

COMMISSIONER OF POLICE CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

( प्रविण पवार )
पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

प्रति :-

1. पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, परिमंडळ-1 व 2, छत्रपती संभाजीनगर.
2. सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर.
3. सर्व पो.स्टे.प्रभारी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

प्रत :-

1) मा. विभागीय आयुक्त, कार्यालय छत्रपती संभाजीनगर
2) जिल्हाधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
3) उपायुक्त,गु.अ.वि.(गुप्तवार्ता) छत्रपती संभाजीनगर.
4) जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
5) केंद्र संचालक, आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर.
6) सोशल मिडीया,गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर.